N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0245 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/07/2025 23:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 03/07/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/07/2025
**Time From (वेळेपासून):** 14:07 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:07 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/07/2025 **Time (वेळ):** 22:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 056
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/07/2025 22:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती लातुर येथिल , घरकुल विभागाचे, कार्यालयात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** तनवीर जनक माने
**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2006
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | महापुर ता जि लातूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | महापुर ता जि लातूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7028415499

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन बालाजी राठोड | | | 1. पंचायत समिती, लातूर,लातूर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | विकास राम चव्हाण | | | 1. कृष्ण नगर, काटगाव, , ताजि लातूर,लातूर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 03/07/2025
फिर्याद

मी तनवीर जनक माने, वय 19 वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा. महापुर ता. जि. लातूर मो.नं. 7028415499 आधार कार्ड नं. 619310808447 असा आहे.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन सध्या बी.ए. चे षिक्षण घेत आहे. मी दिनांक 02/07/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री संतोश बर्गे साहेब यांच्या कार्यालयात जावून त्यांची भेट घेवून एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितले होते. त्यांनी मला दिनांक 03/07/2025 रोजी 09.00 वा. शासकीय विश्रामगृह, औसा रोड, लातूर येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले होते.

त्याप्रमाणे दिनांक 03/07/2025 रोजी सकाळी 09.00 वा. सुमारास वरीलप्रमाणे संािगतलेल्या ठिकाणी हजर आलो. तेथे पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब, पोलीस निरीक्षक विषाल बहात्तरे साहेब हे खाजगी वाहनाने त्यांचे कर्मचारी व दोन पंचासह हजर होते. त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन त्यांचेसमक्ष माझे नाव, गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे.

"मी वरील ठिकाणचा राहणारा असुन सध्या बी.ए. चे षिक्षण घेत आहे. मी वडीलांच्या नावाने शासकीय योजनेसाठी फॉर्म भरून त्याचा पाठपुरावा करत असतो. मी माझ्या वडीलांच्या नावाने सन 2023 मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करून घेण्याकरीता प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर घरकुलाचे दोन हप्ते माझ्या वडिलांच्या खात्यावर जमा झालेले असुन तिसरा हप्ता 30,000/- रूपये जमा होणे बाकी आहे. आमच्या घरकुलाचा तिसरा हप्ता मिळण्यासाठी मी दिनांक 02/07/2025 रोजी पंचायत समिती, लातूर येथील इंजिनियर सचिन राठोड यांना भेटून विनंती केली असता, त्यांनी मला घरकुलाचा तिसरा हप्ता खात्यावर जमा करण्यासाठी 10,000/- रू लाचेची मागणी केली आहे. इंजिनियर राठोड यांना माझी लाच देण्याची बिलकुल इच्छा नाही. परंतू मी इंजिनियर राठोड यांना लाच दिली नाही तर ते माझे काम करणार नाहीत. या भितीपोटी मी त्यांना होकार देवून स्वमर्जीने तक्रार देण्यासाठी आलो आहे. घरकुलाच्या कामासाठी कुठलीही शासकीय फिस लागत नाही. त्यामुळे इंजिनियर राठोड हे मागत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. माझे वडीलांनी त्यांचेवतीने मला तक्रार देण्यासाठी अधिकारपत्र दिले आहे. त्यामुळे मी त्यांचेवतीने लाचेची तक्रार एसीबी कार्यालयास देत आहे.
मी दिनांक 03/07/2025 रोजी पंचायत समिती, लातूर येथील कार्यालयात जावून इंजिनियर सचिन राठोड यांची भेट घेवून त्यांच्याकडे माझ्या कामासंबधी बोलणी करणार आहे. सदर भेटी दरम्यान इंजिनियर राठोड यांनी स्वतः किंवा इतरा मार्फत माझ्या कामा करिता लाचेची मागणी करून ती स्वतः अथवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कायदेषीर कारवाई करण्यात यावी. इंजिनियर राठोड यांचेषी माझा कसलाही पैशाचा देवान घेवानाचा व्यवहार बाकी नसून त्यांचे व माझे कुठलेही वैर नाही." अशा आशयाची मी दिलेली तक्रार सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.
आज दि. 03/07/2025 रोजी पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पंचायत समिती, लातूर येथील इंजिनियर सचिन राठोड यांनी मला माझ्या वर नमुद कामाकरीता म्हणुन लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवले. सापळा अधिकारी बहात्तरे साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री

करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पो.कॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 11.30 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन इंजिनियर सचिन राठोड हे बसत असलेल्या ठिकाणी पंचायत समिती, लातूर येथील दुस-या मजल्यावर घरकुलाचे विभागामध्ये जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक हे शासकीय विश्रामगृह, औसा रोड, लातूर येथे थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 पाटील असे पंचायत समिती, लातूर येथील दुस-या मजल्यावर घरकुल विभागामध्ये इंजिनियर सचिन राठोड हे बसत असलेल्या ठिकाणी गेलो तेथे इंजिनियर राठोड साहेब व माझी भेट झाली. राखाडी रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व राखाडी रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली व्यक्ती हे इंजिनियर राठोड साहेब असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली. इंजिनियर राठोड साहेब यांनी माझे वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष माझेशी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान मी इंजिनियर राठोड साहेब यांना म्हणालो....नमस्कार साहेब त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले...नमस्कार... त्यावर मी म्हणालो... मी काल आलतो की घरकुलाचे हप्त्या संदर्भात... त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले...हं..हं..हं. तिसरं बील व्हय लवकरचं पडल.. तुम्हाला पहिलच पडलय.. शब्दाच्या पुढं गेलय का आपलं... आठ दिवस म्हणले आठ दिवसाच आधीपासुन बील टाकलो..... त्यावर मी म्हणालो... हो... हो... मग आता कसं करावं लागेल..... त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले.... नाही... आता काय .. कालचं बोलणं झालयं की आपलं.... अजून एवढा हे नसतयं... अजून तुम्ही त्येच्यात ... तिच गोष्ट सारखं सारखं.... माझ्याजागी कोणी दुसरं असत तर केल बी नसतं..... त्यावर मी म्हणालो... सांगा की मग.... त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले.... सांगीतल की... कालचं सांगीतलं की... काल बोलणं झालयं तुम्ही अजून आलाव अजून पण बोलायचं राहीलं... त्यावर मी म्हणालो.... मग किती सांगा की... त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले... सांगीतलो की कालच... त्यच्यात एक दोन तीन हजार कमी करा म्हणून सांगीतलो तुम्हाला... त्यावर मी म्हणालो.... किती मधी... त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले.... पंधरा बोलणं झालयं न आपलं...त्यावर मी म्हणालो.... पंधरा हजार ...त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले...हं...एवढे नाही थोडं कमी द्या... तर कमी सांगीतले होते.... त्यावर मी म्हणालो.... किती? त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले...मी तेरा म्हणलो तुला.....दहा हजार आता ... नंतर तीन द्या म्हणलो... त्यावर मी म्हणालो.... हं... हं... काम होईल की आपलं पैशाचं हप्त्याचं.... त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले...सत्तर हजाराचं हप्ता टाकून बी तुम्ही माझ्यावरचं डाऊट खाऊलालावं... तर अवघड गोष्ट हाय बाबा.... त्यावर मी म्हणालो.... मी तडजोड करून सांगतो.... तुम्हाला देतो... कधी येऊ दुपारपस्तोर असतान की... त्यावर इंजिनियर राठोड साहेब म्हणाले...... कधीपण ये... फोन करून ये.... त्यावर मी म्हणालो..... ठिक हाय धन्यवाद सर..... असे म्हणून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 पाटील असे तेथुन निघून बाहेर येवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी अंदाजे 12.16 वाजण्याचे सुमारास आलो असता पोकॉ कोंडरे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 पाटील यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व इंजिनियर राठोड यांच्यात काय बोलणे झाले? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 पाटील यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वानी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कोंडरे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व इंजिनियर राठोड यांच्यात झालेले संभाशण ऐकले. सदर संभाषण हे पंच क्रमांक 1 पाटील यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन इंजिनियर राठोड यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 13,000/- रुपये लाचेची स्वतः मागणी करुन सध्या 10,000/- रूपये देण्यास सांगितले व घरकुलाचा तिसरा हप्ता पडल्यावर उर्वरित 3,000/- लाचेची रक्कम देण्यास सांगितल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 10,000/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविले.

पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांनी मला इंजिनियर सचिन राठोड यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा असे एकुण 10,000/- रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक विषाल बहात्तरे साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/गंभीरे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या गळयातील मफलर काढुन तोंड पुसणे बाबतचा सुनियोजीत ईशारा करणेबाबत सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे यांचे सुचनेवरून इंजिनीयर राठोड

यांचे मोबाईलवर कॉल करून ते कार्यालयात हजर आहेत का? विचारले असता त्यांनी इंजिनीयर राठोड साहेब यांनी हं... आहे ऑफिसला असे म्हणाले. त्यानंतर पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 14.00 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन पंचायत समिती, लातूर येथील दुस-या मजल्यावरील घरकुलाचे कार्यालयामध्ये इंजिनियर सचिन राठोड बसत असलेल्या ठिकाणी जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक पंचायत समिती कार्यालयाच्या आजुबाजुस कोणाच्या नजरेत येणार नाही असे अडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 पाटील असे इंजिनियर सचिन राठोड बसत असलेल्या घरकुलाचे कार्यालयात जावुन इंजिनियर सचिन राठोड यांची भेट घेतली. चर्चेदरम्यान मी म्हणालो.... नमस्कार त्यावर इंजिनियर सचिन राठोड म्हणाले... या की ...या की... बोला की... त्यावर मी म्हणालो... मणले तेवढे आणले मी... दहा.... त्यावर इंजिनियर सचिन राठोड म्हणाले... त्येच्याकडं द्या ... त्येच्याकडं द्या...?... त्यावर मी म्हणालो... त्येच्याकडं देवू का?....असे म्हणुन इंजिनीयर सचिन राठोड यांचे समोर बसलेला आकाशी निळया रंगाचा शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेला इसम यांनी मला घरकुल विभागाचे बाहेर नेवून म्हणाले..... किती हायत मोपायचे नाहीत... तुम्ही मोजलाव का किती हायत?..... असे म्हणून मी माझेजवळील 500/-रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा असे एकुण 10,000/-रुपये आकाषी निळया रंगाचा शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेला इसम यांना दिली. ती रक्कम त्यांनी घेवुन मोजले व म्हणाले...ओके ... टाकलय का नाही बील.... त्यावर मी म्हणालो .....नाही टाकलं त्यांना म्हणा की....त्यावर आकाशी निळया रंगाचा शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेला इसम म्हणाला ... आता लगेच टाकाया लावतो... एका मिनीटात.....चला मधी.... त्यावर आम्ही दोघे घरकुल विभागामध्ये आलो त्यावेळी मी इंजिनीयर सचिन राठोड साहेब यांना म्हणालो बघा की लवकर काय ते.... त्यावर इंजिनीयर सचिन राठोड साहेब म्हणाले आठ दिवसात.... असे म्हणून मी बाहेर येवून नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. त्यानंतर लगेच सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब, पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब, पंच क्र. 02 सुतार व सापळा पथकातील सदस्यासह माझे जवळ आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कोंडरे यांचेकडे दिले ते त्यांनी अंदाजे 14.11 वाजण्याच्या सुमारास घेवुन बंद केले. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांनी पंच क्रमांक 1 पाटील यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 पाटील यांनी सांगितले की, समोर राखाडी रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व राखाडी रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली व्यक्ती हे इंजिनियर सचिन राठोड असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांचे कार्यालयात बसलेल्या आकाशी निळया रंगाचा शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेला इसम यांचेकडे देण्यास सांगितल्याने तक्रारदार यांनी इंजिनियर सचिन राठोड यांचे सांगणे प्रमाणे आकाशी निळया रंगाचा शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेला इसम यांना लाचेची रक्कम दिली असता त्यांनी सदर लाच रक्कम स्विकारली व ती मोजून इंजिनियर सचिन राठोड यांचे समोर धरले असता, इंजिनियर राठोड यांनी सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष त्यांचे समोरील टेबलावर ठेवण्यास सांगितली अशी हकीकत पंच क्र. 1 पाटील यांनी सांगितली. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र निळया रंगाचा शर्ट व काळी जिन्स पॅन्ट घातलेल्या इसमास दाखवून त्याचे नाव गांव विचारले असता त्याने त्याचे नाव विकास राम चव्हाण वय 29 वर्श, व्यवसाय - शेती रा. कृष्ण नगर, काटगाव, ता.जि. लातूर असे सांगितले. त्यास तक्रारदार यांचेकडून स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली असे विचारता त्याने सांगितले की, सदर 10,000/- रू हे इंजिनियर सचिन राठोड यांचे समोरील टेबलवर कागदामध्ये ठेवल्याचे सांगितले. इंजिनियर सचिन राठोड यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सचिन बालाजी राठोड, वय 24 वर्शे, पद - ग्रामीण गृहनिमार्ण अभियंता (रूरल हाउसिंग इंजिनियर), इलोसे, नेमणुक घरकुल विभाग, पंचायत समिती, लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे साहेब यांनी पंच क्रमांक 2 सुतार यांचे हस्ते आरोपी सचिन बालाजी राठोड यांच्या टेबलवर कागदामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 पाटील यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर आरोपी सचिन बालाजी राठोड यांना ताब्यात घेवुन तेथील आवश्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली आहे.

तरी यातील आरोपी सचिन बालाजी राठोड, वय 24 वर्शे, पद - ग्रामीण गृहनिमार्ण अभियंता (रूरल हाउसिंग इंजिनियर), इलोसे, नेमणुक घरकुल विभाग, पंचायत समिती, लातूर यांनी माझे वडील जनक रामदास माने यांचे नावे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूरीचा तिसरा हप्ता खात्यावर जमा करण्याचे कामासाठी म्हणुन दिनांक 03/07/2025 रोजी पंचासमक्ष 13,000/-रू. लाचेची मागणी करून आता 10,000/- रूपये देण्यास सांगितले व उर्वरित 3,000/- रक्कम घरकुलाचा तिसरा हप्ता पडल्यावर देण्यास सांगितले. सदर लाचेची रक्कम 10,000/- रूपये दिनांक 03/07/2025 रोजी विकास राम चव्हाण वय 29 वर्श, व्यवसाय - शेती रा. कृष्ण नगर, काटगाव,

ता.जि. लातूर (खाजगी इसम) यांचेकडे देण्यास सांगितली व आरोपी खाजगी इसम विकास चव्हाण यांनी पंचायत समिती, लातूर येथील घरकुल विभागाचे बाहेर 14.07 वाजण्याचे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारून सदर लाच रक्कम ही इंजिनियर सचिन राठोड यांचेकडे दिली आहे व त्याबाबत कोणतीही पावती दिलेली नाही, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पो.कॉ गंभीरे यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन, ती वाचुन पाहिली. मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

ही फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

DILIP DIGAMBAR SAGAR(I (Inspector)) / PI **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

पो. ठाणे अंमलदार
पो. स्टे. शिवाजी नगर, लातूर

**Name (नाव):** DILIP DIGAMBAR SA

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI